Exh. 15

रे.क.नं.१७४/२०२५

**मे. कागल येथील सि.ज.ज्यु.डि.**

**यांचे कोर्टात ...**

रमजान दादू शानेदिवाण ......... वादी

विरुध्द

इम्रान मौलाली शानेदिवा वगैरे ......... प्रतिवादी

**यातील प्रतिवादी नं. १ ते ३ तर्फे वादीचे दावेस कैफियत व मनाई अर्जास म्हणणे पुढील प्रमाणे :-**

१) वादीचे दावेतील व मनाई अर्जातील सर्व मजकूर चुकीचा, खोटा, लबाडीचा असून तो प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाही.

Order
R and R
C.J.J.D.,
Kagal
19.1.26

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

२) दावा अर्जी कलम १ ते ४ व मनाई अर्जामधील सर्व मजकूर चुकीचा खोटा,लबाडीचा असून प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाही. दावेमधील दावा मिळकतीचे वर्णन पूर्णपणे चुकीचे आहे. दावा मिळकतीच्या वर्णनामध्ये दावा मिळकतीचे क्षेत्र जाणीवपूर्वक नमूद केलेले नाही. या मुद्यावरतीच दावा नामंजूरीस पात्र आहे. तसेच दावेसोबत दावा मिळकतीचा जोडलेला हस्तनकाशा पूर्णपणे खोटा व चुकीचा आहे.

३) दावा मिळकत ही वादीचे वडिलांनी वादी यास मालकी हक्काने दिलेबाबत दावेतील कथने पूर्णपणे खोटी व चुकीची आहेत. त्याचप्रमाणे वादीचे वडिल हयात असताना प्रस्तुत प्रतिवादी हे बाचणी गावामध्ये घरे बांधून राहत असल्याचे व त्यांचा दावा मिळकतीशी संबंध नसल्याचे कथन पूर्णपणे खोटे व चुकीचे आहे. ग्रा.मि.नं.२१५ मधील वादीचे जुने घर असल्याचे कथन पूर्णपणे खोटे आहे. त्याचप्रमाणे दावेतील १० फुट रुंदीच्या रस्त्याबाबतची कथने वस्तुस्थितीशी विसंगत आहेत. त्याचप्रमाणे प्रतिवादीनी ग्रामपंचायत बाचणी यांचेशी संगनमत करुन बेकायदेशीर नोंदी केल्याचे कथन पूर्णपणे खोटे व चुकीचे आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी नं.१ हे ग्रा.मि.नं.२१५ मध्ये बांधकाम करीत असल्याचे कथन पूर्णपणे खोटे व



Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

चुकीचे आहे. प्रतिवादींनी वादी यांना मारहाण करणेची धमकी दिल्याचे व भांडण काढल्याचे कथन पूर्णपणे खोटे आहे. तसेच प्रतिवादींनी दिलेल्या मानसिक त्रासामुळे वादीची पत्नी मयत झाल्याचे कथन पूर्णपणे खोटे असून वादी हे केवळ मा.न्यायालयाकडून सहानभूती मिळणेकरिता त्याबाबतची कथने करीत आहेत. त्याचप्रमाणे प्रस्तुत प्रतिवादीनी बेकायदेशीर अंगबळाचे जोरावर बांधकाम चालू केल्याचे व सदर बांधकामामुळे वादीचे कथित रस्त्यावर अडथळा होणार असल्याचे कथन पूर्णपणे खोटे व चुकीचे आहे.

४) दावेस कारण घडलेले नाही. दावा अर्जी कलम ५ मध्ये नमूद केलेले दावेस कारण चुकीचे,खोटे व काल्पनिक असून प्रतिवादींना मान्य व कबूल नाही.

५) वादीस दावा अर्जी कलम ११ मध्ये मागितलेली दाद कायद्याने देता येणार नाही. वास्तविक सदर विनंती कलमामध्ये वादी यांनी मालकीबाबतची हक्कज्ञापनाची मागणी केलेली आहे. वास्तविक दावा मिळकती या ग्रामपचांयत हद्दीतील घरठाणपत्रकी नोंद असलेल्या मिळकती असल्यामुळे त्याचे हक्काज्ञापनाकरिता महाराष्ट्र कोर्ट फी ॲक्टमधील तरतुदीनुसार



Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

एकूण बाजारभाव/मूल्यांकन करुन त्यावरती कोर्ट फी स्टँम्प देणे गरजेचे आहे. वादीनी याप्रकारे आकारणी केली नसल्याने प्रस्तुतचा दावा सि.पी. सी. ऑर्डर ७ रुल ११ प्रमाणे रद्द होणेस पात्र आहे. त्याचप्रमाणे सदर विनंती कलमामध्ये प्रतिवादी नं.५ यांचेविरुध्द मागणी केलेप्रमाणे मनाई देण्याचे कार्यक्षेत्र या मे.कोर्टास येत नाही. त्याचप्रमाणे सदर मागणी पाहता या कामी महाराष्ट्र शासन आवश्यक पक्षकार आहेत. महाराष्ट्र शासनास पक्षकार केलेखेरीज सदरचा दावा चालणेस पात्र नाही. वास्तविक प्रतिवादी नं.५ यांचेकडे महाराष्ट्र शासनाकडून शासकिय घरकुल अनुदान वर्ग होत असते व त्यानंतर प्रतिवादी नं.५ हे केवळ त्याचे वाटप करीत असतात. त्यामुळे प्रतिवादी नं.५ विरुध्द मागणी केलेप्रमाणे मनाई आदेश कायद्यानेच वादी यांना मागता येणार नाही. त्याबाबत वादींची काही हरकत असलेस महाराष्ट्र शासनाविरुध्द वादी यांनी दाद मागणे गरजेचे आहे. तथापी वादी यांनी महाराष्ट्र शासनाविरुध्द कोणतीही दाद मागीतली नसल्याने याप्रकारे मागणी देता येणार नाही.

६) वादीनी जाणीवपूर्वक संपूर्ण दावेमध्ये वादी व प्रतिवादींचे नातेसंबंध नमूद केलेले नाही. वास्तविक वादी, प्रतिवादी नं.२ व ३ हे सख्खे बंधू असून

..५/-

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

प्रतिवादी नं.४(अ) व (ब) हे वादी व प्रस्तुत प्रतिवादींचे बंधू मयत मकबूल यांचे वारस आहेत. याखेरीज वादी व प्रतिवादी नं.२ व ३ यांना रजाक हा देखील एक भाऊ आहे. यातील वादी व प्रतिवादी नं.२ व ३ तसेच रजाक व मयत मकबूल या सर्वांचे वडिल दादू महमंद शानेदिवाण हे होय. यातील वादी, प्रतिवादी हे मुस्लीम धर्मीय होय. मुस्लीम शरीयत कायद्यानुसार सदर दादू महमंद शानेदिवाणी हे हयात अस ताना त्यांची अपत्ये वादी, प्रतिवादी नं.२ व ३ तसेच रजाक व मयत मकबूल यांना दादू यांचे नावचे मिळकतीमध्ये कोणताही वारसाहक्क कायद्याने येऊ शकत नाही. मुस्लीम शरीयत कायद्यानुसार वडिलांचे मृत्यूनंतर मुलांचा व इतर वारसांचा वारसाहक्क चालू होतो. त्यामुळे दावेतील कलम २ मधील वादीचे कथन, वादीचे वडिलांनी त्यांचे हयातीत सन १९९३/९४ मध्ये दावा मिळकती वादीचे नावे नोंद करुन मालकी हक्काने दिल्याबाबतची कथने पूर्णपणे खोटी व चुकीची व मुस्लीम कायद्याविरुध्द असल्याचे स्पष्ट आहेत.

७) दादू महमंद शानेदिवाण यांच्या बाचणी,ता.कागल या गावी ग्रा.मि.नं.२१४, २१५,२०८ व २१६ या घर मिळकती व पडसर जागा मिळकती होय.



Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

दादू महमंद शानेदिवाण हे मयत झालेनंतर दावा मिळकत ग्रा.मि.नं.२१४ यामध्ये यातील वादी हे स्वतंत्रपणे कब्जेवहिवाट करु लागले. सदर ग्रा.मि.नं. २१४ मध्ये वादी यांनी शासकिय घरकुल योजनेतून तळमजला व पहिला मजला असे घराचे बांधकाम केलेले आहे. त्याचप्रमाणे ग्रा.मि.नं.२१६ ही संपूर्ण मिळकत यातील प्रतिवादी नं.२ यांचेकडे दादू महमंद शानेदिवाण याचे मृत्यूनंतर कब्जेवहिवाटीस आलेली असून सदर ग्रा.मि.नं.२१६ मधील पडसर जागेस ग्रा.मि.नं.२१६/१ असा स्वतंत्र नंबर ग्रामपंचायतीने दिलेला असून तो प्रतिवादी नं.१ चे नावे नोंद आहे. यातील प्रतिवादी नं.१ हा प्रतिवादी नं.२ चा मुलगा आहे. ग्रा.मि.नं.२१६/१ यामधील खुल्या पडसर जागेमध्ये प्रतिवादी नं.१ व २ हे शासकिय घरकुल योजनेतून त्यांचे जुने घर उतरवून नविन आर.सी.सी. घराचे बांधकाम चालू केलेले आहे. ग्रा.मि.नं. २१६ व २१६/१ चे करआकारणी उताऱ्यावरती असलेल्या नोंदीबाबत वादी अगर इतर प्रतिवादींनी कधीही तक्रार केलेली नव्हती व नाही. सदर ग्रा.मि.नं.२१६ मधील जुने घर जीर्ण व मोडकळीस आल्याने प्रतिवादी नं. १ व २ यांनी सदर जुने घर उतरवून त्यांचे स्वतंत्र ग्रा.मि.नं.२१६ व २१६/१ यामध्ये नविन आर.सी.सी. घराचे बांधकाम चालू केलेले आहे व सदरचे बांधकाम पाया भरुन घेवून ३ फुट उंचीने पूर्ण झालेले आहे.

..७/-

Asstt. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

८) यातील प्रतिवादी नं.१ व २ हे ग्रा.मि.नं.२१६ व २१६/१ चा ग्रामपंचायत कडील कर नियमीतपणे भरत असतात. तसेच सदर मिळकतीमध्ये प्रतिवादी नं.२ यांचे नावे स्वतंत्रपणे विद्युतजोडणी असून त्याचे बिल देखील प्रतिवादी नं.२ हे नियमीत भरत असतात. यावरुन ग्रा.मि.नं.२१६ व २१६/१ या मिळकतीशी वादीचा अगर इतर प्रतिवादींचा कोणताही मालकी हक्क, संबंध नसल्याचे स्पष्ट आहे.

९) वादीला ग्रा.मि.नं.२१४ मध्ये घर मिळकतीस जाणे-येणेकरिता प्रतिवादी नं.१ यांचे नावे नोंद असलेल्या ग्रा.मि.नं.२१६/१ या खुल्या जागेतून ५ फुट रुंदीचा रस्ता सोडलेला असून यातील प्रतिवादीनी कधीही वादीला सदर रस्ता वापरणेस अडथळा केलेला नाही. याप्रमाणे दावेत कथन केले प्रमाणे १० फुट रुंदीचा रस्ता अस्तित्वात असलेबाबत कोणताही पुरावा वादीकडे नाही. यावरुन केवळ असुह्येपोटी प्रतिवादी नं.१ व २ यांचे कायदेशीर बांधकाम बंद पडावे या हेतूने अपुऱ्या माहितीवर व खोट्या कथनांचे आधारे दावा व मनाईचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी यांचेविरुध्द दाखल केलेला आहे. सबब दावा व मनाईचा अर्ज नामंजूरीस पात्र आहे.



Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

१०) दावा ग्रा.मि.नं.२१६ व २१६/१ याखेरीज अन्य कोणतीही घर मिळकत यातील प्रतिवादी नं.१ व २ यांना नाही. सदर घर मिळकत पूर्णपणे जीर्ण व राहणेस अयोग्य व धोकादायक झाल्याने प्रतिवादी नं.१ व २ यांनी त्यांचे कुटूंबियांना राहणेकरिता सदर मिळकतीमध्ये राहते घराचे बांधकाम शासकिय घरकुल योजनेतून अनुदान घेवून सुरु केलेले आहे, ही बाब वादी यांनी लपवून ठेवलेली आहे.

११) बाचणी,ता.कागल येथील दादू यांच्या नावच्या उर्वरित ग्रा.मि.नं.२१५ व २०८ या मिळकती वादी,प्रतिवादी नं.२,३, मयत मकबूल व रजाक या पाच भावांचे नावे ग्रामपंचायतीस नोंद आहेत. या मिळकतींपैकी ग्रा.मि.नं. २०८ यामध्ये रजाक व मयत मकबूल यांचे वारस स्वतंत्रपणे राहणेस आहेत व ग्रा.मि.नं.२१५ या मिळकतीमध्ये प्रतिवादी नं.३ याचे राहते घर असून इतर क्षेत्र हे पाचही भावंडे सोयीप्रमाणे वापरत आहेत. ही सर्व वस्तुस्थिती वादी यांनी मे.न्यायालयापासून लपवून ठेवलेली आहे. त्यामुळे मनाईसारखी समदायिक दाद वादी यांना देता येणार नाही.

१२) वादी हा ग्रा.मि.नं.२१४ या मिळकतीमध्ये तळमजला व पहिला मजला



Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

असे घराचे बांधकाम करुन राहत आहे. प्रतिवादी नं.३ तसेच मयत मकबूल व रजाक या सर्वांची ज्याचे त्याचे घरामध्ये स्वतंत्र रहिवास सुरु आहे. यातील प्रतिवादी नं.२ यांचे ग्रा.मि.नं.२१६ यामधील जुने घर जीर्ण होवून राहणेस अयोग्य झाल्याने आता केवळ प्रतिवादी नं.२ हे स्वतःच राहणेकरिता त्यांचे ग्रा.मि.नं.२१६ व २१६/१ या मिळकतीमध्ये घराचे बांधकाम करीत आहेत. सदर बांधकामास मनाई आदेश झालेस प्रतिवादी नं.१ व २ यांना आपले कुटूंबासमवेत राहणेकरिता निवारा होणार नाही. सध्या प्रतिवादी नं.१ व २ हे बाचणी गावातील भिमराव गोंधळी यांचे घरामध्ये भाड्याने राहत आहेत. अशी वस्तुस्थिती असल्याने वादीचा दावा व मनाईचा अर्ज चालणेस पात्र नाही.

१३) वादीस सकृतदर्शनी केस नाही. न्यायाचा तराजू प्रतिवादी नं.१ ते ३ चे बाजूने आहे. जर मे.कोर्टांनी वादीचा मनाईचा अर्ज मंजूर केला तर प्रतिवादी नं.१ ते ३ चे अतोनात नुकसान होणार आहे. याउलट सदर मनाईचा अर्ज नामंजूर झाला तर वादीचे काहीही नुकसान होत नाही.

१४) केवळ प्रतिवादी नं.१ ते ३ यांना शारीरिक,आर्थिक व मानसिक त्रास देणेसाठी वादीनी खोट्या दाव्याची रचना केलेली आहे. त्यामुळे वादीकडून प्रतिवादी

..१०/-

[signature]
Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

नं.१ ते ३ यांना नुकसान भरपाई म्हणून रक्कम रुपये ५०,०००/- याच कामी वसूल होवून मिळावेत.

१५) **तरी प्रतिवादी नं.१ ते ३ ची विनंती की,**

अ) वादीचा दावा व मनाईचा अर्ज कोर्ट खर्चासह नामंजूर करणेत यावा.

ब) जरुर तर जादा कैफियत देणेस परवानगी मिळावी.

क) न्यायाचे सर्व हुकूम याच कामी करणेत यावेत.

..........येणेप्रमाणे कैफियत, म्हणणे असे.

कागल

ता.१९/०१/२०२६

## प्रतिज्ञा

मी यातील प्रतिवादी नं.१ ते ३ लेखाद्वारे अशी सत्य प्रतिज्ञा करतो की, वरील कैफियतीमधील व म्हणणेमधील सर्व मजकूर आमचे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा. आज मु।।

कागल,ता.१९/०१/२०२६.

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

## ॲफिडेव्हीट

मी प्रतिवादी नं.२ श्री.मौलाली दादू शानदिवाण, व.व.६५, धंदा-शेती, रा.बाचणी,ता.कागल, जि.कोल्हापूर देवाची शपथ घेवून सत्य प्रतिज्ञेवर असे ॲफिडेव्हीट करतो की, वरील कैफियतीमधील व म्हणणेमधील सर्व मजकूर माझे माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केले ॲफिडेव्हीट आज मु।। कागल, ता.१९/०१/२०२६.

I know the deponent
Nmali
Adv.N.p.mali

मौलाली दादू शानदिवाण

## प्रतिज्ञा

मी प्रतिवादी नं.२ या लेखाद्वारे अशी सत्य प्रतिज्ञा करतो की, वरील ॲफिडेव्हीटमधील सर्व मजकूर माझे माहितीप्रमाणे व समजुती प्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा, आज मु।। कागल, ता.१९/०१/२०२६.

मौलाली दादू शानदिवाण

Solemnly Affirmed before me by
Shri. Maulali Dadu Shanediwan
Age 65 of Bachni, Kagal who is
identified by Shri N.D. Mali Adv
.............whom I know personally
Dated :- 19/1/25

Assistant Superintendent

MADKE AJIT BHISHMA
Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2026.01.19 17:06:30 +0530